**मुंबई मेट्रो मार्ग १०- गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१९/प्र.क्र. ०९ /नवि-७,**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ६ सप्टेंबर, २०१९.

**प्रस्तावना :-**

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २८ मे, २००४ रोजी झालेल्या ११० व्या बैठकीत दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी तयार केलेल्या मुंबई मेट्रो मार्गाच्या बृहत् आराखडयास आणि त्यांच्या अंमलबजावणीच्या टप्प्यास मान्यता मिळाली आहे. सदर बृहत् आराखडयात एकूण ९ मेट्रो मार्ग असून त्यांची एकूण लांबी १४६.५० कि.मी. इतकी असून ते सन २०२१ पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित होते. सदर आराखडयातील मार्गांचे अंमलबजावणी धोरण निश्चित करतेवेळी व सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करताना त्यात काही बदल करण्यात आले असून सुधारीत मेट्रो मार्ग बृहत आराखडयानुसार शासनाने २७५.३ कि.मी. लांबीच्या मेट्रो मार्गास मान्यता दिली आहे.

मुंबई मेट्रो मार्ग १० गायमुख शिवाजी चौक (मिरा रोड) या मार्गिकेची एकूण लांबी ९.२०९ कि.मी. असून (८.५२९ कि.मी. उन्नत मार्ग) आणि (०.६८ कि.मी. भुयारी मार्ग) यामध्ये एकूण ४ उन्नत मेट्रो स्थानके प्रस्तावित आहेत. मेसर्स दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी या मेट्रो मार्गाचा सविस्तर प्रकल्प अहवाल माहे सप्टेंबर २०१८ मध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास सादर केला असून सल्लागाराने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे सादर केलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या सविस्तर प्रकल्प अहवालासह प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला आहे. सदर प्रकल्पाच्या प्रस्तावास राज्य शासनाकडून मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुषंगाने शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**०२. शासन निर्णय :-**

मुंबई मेट्रो मार्ग १० - गायमुख - शिवाजीचौक (मिरारोड ) या प्रकल्पाचे महत्व लक्षात घेता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी सादर केलेल्या सदर मेट्रो रेल्वे प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यास पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

१) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी सादर केलेल्या मेट्रो मार्ग १० या ९.२०९ कि.मी. लांबीच्या (८.५२९ कि.मी. उन्नत मार्ग व ०.६८ कि.मी. भूमिगत मार्ग), ४ उन्नत स्थानके असलेल्या सोबतच्या परिशिष्ठ-१ मध्ये तपशिल नमूद केलेल्या मेट्रो प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित यांनी अंदाजित केलेल्या मेट्रो मार्ग १० प्रकल्पाकरीता रु.४४७६ कोटी प्रकल्प पूर्णत्व किंमतीचा प्रकल्प परिशिष्ठ-२ प्रमाणे आर्थिक सहभाग घेऊन अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३) सदर प्रकल्प मार्च २०२२ पर्यंत पूर्ण करावयाचे उद्दिष्ट असल्याने, मेट्रो प्रणालीसाठीचा कर्ज प्रस्ताव अंतिम होण्यापूर्वी प्रकल्पाचे स्थापत्य बांधकाम करण्यासाठी लागणाऱ्या रु. ३५४.७७ कोटी खर्चासाठी सुरुवातीला प्राधिकरणाचा निधी वापरण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४) नागपूर मेट्रो आणि मुंबई मेट्रो मार्ग ३ प्रमाणे मेट्रो मार्ग १० या प्रकल्पासाठी जमिनीची किंमत, राज्यशासनाचे कर व केंद्रीय कराच्या ५० टक्के खर्चाकरीता राज्यशासनाकडून रु. ७७६.७१ कोटी बिनव्याजी दुय्यम कर्ज देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

५) सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने देऊ केलेल्या रु. ७७६.७१ कोटी दुय्यम कर्ज रक्कमे व्यतिरिक्त अन्य कोणताही भार तसेच प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या निधीचा भार राज्य शासनावर येणार नाही याची मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खबरदारी घ्यावी.

६) सदर प्रकल्प मेट्रो कायदा २००९ (सुधारीत) अंतर्गत राबविण्यास तसेच प्रकल्पाची अंमलबजावणी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

७) सदर प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान मार्गिकांमध्ये (Alignment) तसेच स्थानकांमध्ये गरज भासल्यास किरकोळ बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

८) सदर प्रकल्प अंमलबजावणीकरीता प्राधिकरणाकडील स्वत:चा निधी व जागतिक बँक / न्यु डेव्हलपमेंट बँक / जपान आंतरराष्ट्रीय सहकार्य संस्था इ. आंतरराष्ट्रीय / अंतरदेशीय वित्तीय संस्थेमार्फत कर्ज सहाय्य त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर घेण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

९) सदर प्रकल्पासाठी द्विपक्षीय/बहुपक्षीय/आंतरराष्ट्रीय अशा विविध वित्तीय संस्थांकडून कर्ज घेणेसाठी केंद्र सरकार आणि आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्था यांच्याबरोबर समन्वय साधणे आणि प्रकल्प अंमलबजावणीच्या पुढील सर्व कार्यवाहीकरीता त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१०) देशातील विविध मेट्रो प्रकल्प राबविण्यासाठी केंद्र शासनामार्फत १०% (खाजगी गुंतवणूक जमिनीची किंमत, पुनर्वसन व पुनर्वसाहत, राज्य शासन कर वगळून) निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्याचधर्तीवर या प्रकल्पाकरीता केंद्र शासनाकडून निधी मिळविण्याकरीता राज्यशासनामार्फत पाठपुरावा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

११) सदर प्रकल्पाकरीता बहुपक्षीय / व्दिपक्षीय आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थाकडून थेट कर्ज घेण्यास त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१२) मुंबई मेट्रो मार्ग २अ, २ब, ४, ५, ६ ,७, ७ अ आणि ९ या प्रकल्पाकरिता ज्याप्रमाणे इतर विविध स्त्रोतामधून प्राप्त होणारा निधी "**समर्पित नागरी परिवहन निधी**" मध्ये संकलित करण्यास मंत्रिमंडळाची या पूर्वीच मान्यता मिळाली त्याच धर्तीवर मेट्रो मार्ग १० साठी सदर विविध स्त्रोतातून निधी उभारुन समर्पित नागरी परीवहन निधी मध्ये संकलित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१३) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता दुरुस्ती व देखभाल आगारासाठी मोघरपाडा येथील जमीन व उपलब्धतेनुसार किंवा आवश्यकतेप्रमाणे इतर जागा वापरास मान्यता देण्यात येत आहे तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ कायद्यानुसार आवश्यक ते बदल करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१४) अतिरिक्त जमीन उपलब्धतेनुसार प्रकल्पासाठी निधी उभारण्याच्या दृष्टीने रहिवाशी /वाणिज्यिक विकास करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे तसेच कारडेपोकरीता आवश्यक असलेल्या खाजगी जमिनी मेट्रो रेल्वे अधिनियम, २००९/ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४/ महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ /नविन केंद्रीय भूसंपादन व पुनर्वसन व पुनर्वसाहत अधिनियम, २०१३ अंतर्गत संपादन करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

१५) सदर मेट्रो प्रकल्प अंमलबजावणी करण्याकरीता नियुक्त करण्यात येणारे मनुष्यबळ जसे की, तांत्रिक, सहाय्यक व व्यवस्थापकीय अधिकारी / कर्मचारी वर्ग तसेच भ्रमणध्वनी, फर्निचर, वाहन इ. साठी लागणारा एकूण व्यवस्थापकीय खर्च हा सर्व मेट्रो प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या २% पेक्षा जास्त नसावा, या अटीस अधीन राहून अत्यावश्यक असलेले तांत्रिक मनुष्यबळ हे सरळसेवा भरती / प्रतिनियुक्ती / पदोन्नती / कंत्राटी या तत्त्वावर नियुक्त करण्याच्या त्याचे कोणतेही दायित्व/जबाबदारी राज्यशासनावर येणार नाही या अटीवर प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

१६) मेट्रो मार्ग १० गायमुख ते शिवाजी चौक (मिरा रोड) चा प्रस्ताव सादर करताना सुरुवातीच्या भाडे दराचे टप्पे **मेट्रो मार्ग** ४ **च्या धर्तीवर** खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे प्रवासी भाडेदरास मान्यता देण्यात येत आहे तसेच उल्लेखित केलेले भाडे मेट्रो सुरु करण्यापूर्वी वित्तीय व्यवहार्यता तपासून गरज भासल्यास त्यामध्ये आवश्यक बदल करण्याचे अधिकार वापरण्यास प्राधिकरणास प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| ***अंतर (कि.मी.)*** | *०-३* | *३-१२* | *१२-१८* | *१८-२४* | *२४-३०* | *३०-३६* | *३६-४२* | *>४२* |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ***भाडे (रु.)*** | *१०* | *२०* | *३०* | *४०* | *५०* | *६०* | *७०* | *८०* |

१७) शासकीय / निमशासकीय /स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सदर मेट्रो प्रकल्पासाठी कायमस्वरुपी आवश्यक असलेल्या जमिनी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे नाममात्र दराने हस्तांतरित करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

१८) सदर मेट्रो मार्गालगतच्या शासकीय व निमशासकीय संस्थांच्या मोकळया जागांचा मेट्रो रेल्वे बांधकाम कालावधी दरम्यान तात्पुरता वापर करण्यासाठी तसेच संबंधित विभागांनी सदर मोकळया जागा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला नाममात्र दराने सुपूर्द करण्याबाबत संबंधित विभागांस निर्देश देण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

१९) मेट्रो रेल्वे स्थानक व कारडेपोच्या व्यावसायिक वापरास परवानगी देणे व त्यानुसार सदर जमिनीचा वाणिज्यिक विकास करण्याचे अधिकार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२०) सदर मेट्रो प्रकल्पांतर्गतच्या प्रकल्पबांधितांचे (PAP) पुनर्वसन व पुनर्वसाहत आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थेची सहमती घेऊन "मुंबई नागरी परिवहन प्रकल्प पुनर्वसन व पुनर्वसाहत धोरणा (MUTP -R & R Policy)" नुसार करण्याकरीता मान्यता देण्यात येत आहे.

२१) सदर मेट्रो प्रकल्पाकरीता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास आवश्यकतेनुसार "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणून नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२२) मेट्रो मार्ग १० हा मेट्रो प्रकल्प "निकडीचा सार्वजनिक प्रकल्प" व "महत्वपूर्ण नागरी वाहतूक प्रकल्प" म्हणून घोषित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२३) शासकीय / खाजगी संस्थांना मेट्रो प्रकल्प इतर प्रकल्पापेक्षा महत्वाचा असेल असे निर्देश देण्यास प्राधिकरणाला प्राधिकृत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२४) दिल्ली मेट्रो रेल्वे महामंडळ मर्यादित आणि मुंबई उपनगरीय रेल्वेकरीता सवलतीच्या दरात वीज उपलब्ध होत असून त्याच धर्तीवर महाराष्ट्र विद्युत नियामक मंडळाकडून मेट्रो प्रकल्पांकरीता सवलतीच्या दरात 'ना नफा ना तोटा' या तत्वावर एमएमआरडीएस वीज उपलब्ध करुन देण्याची शासनामार्फत शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२५) सदर प्रकल्पाच्या प्रस्तावित मेट्रो मार्गाचा सुमारे १.२ कि.मी. चा भाग संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून (कार्यरत असलेल्या रस्त्याच्या बाजूने) जात असल्याने त्याकरिता आवश्यक ती परवानगी वन विभागाकडून लवकरात लवकर उपलब्ध करुन देण्यास शिफारस करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२६) सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने मान्य केल्यानुसार नाममात्र दराने उपलब्ध करावयाची जमिन आणि शासनाने देऊ केलेल्या रक्कमे व्यतिरिक्त अन्य कोणताही भार तसेच प्राधिकरणामार्फत उभारण्यात येणाऱ्या निधीचा भार राज्य शासनाच्या अर्थसंकल्पावर येणार नाही, या अटीवर प्रकल्पास मान्यता देण्यात आली आहे, याची नोंद घेऊन त्याप्रमाणे आवश्यक ती खबरदारी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने घ्यावी.

२७) सदर प्रकल्पाची अंदाजित किंमत, प्रकल्पामधुन मिळणारा परतावा याकरिता प्रकल्प अहवालात घेण्यात आलेल्या गृहीतकांची कसोशीने तपासणी करणे व ह्या बाबींवर स्वतंत्र अभिप्राय (Second opinion) घेण्याची कार्यवाही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने करावी.

हा शासन निर्णय नियोजन विभागअनौपचारीक संदर्भ क्र.३० /१९/१४४४, दिनांक ०६.०५.२०१९ व वित्त विभाग अनौ२१५ .क्र.सं./१९/व्यय-३, दिनांक३१ .०८. २०१९अन्वये प्राप्त अभिप्राय व मंत्रिमंडळाने दिनांक २३.०७.२०१९ रोजी मान्यता दिल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०९०६१२०६३३९४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VIJAY KARBHARI CHAUDHARI
Date: 2019.09.06 16:58:36 +05'30'

**(विजय चौधरी)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य, यांचे सचिव.
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३. मा. राज्यमंत्री (नवि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
५. मा. सचिव, शहरी विकास मंत्रालय, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली
६. अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
७. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. अपर मुख्य सचिव (नवि-१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. प्रधान सचिव (पदुम), कृषी, पशु संवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२. प्रधान सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१४. प्रधान सचिव (उद्योग) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१५. प्रधान सचिव (ऊर्जा) उद्योग ऊर्जा व कामगार विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१६. प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग , मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१७. प्रधान सचिव पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१८. सचिव (विशेष प्रकल्प), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१९. सचिव शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

२०. सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
२१. नोंदणी महानिरिक्षक व नियंत्रक मुद्रांक नियंत्रक पुणे
२२. व्यवस्थापकीय संचालक, मंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रायव्हेट लिमिटेड.
२३. विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई.
२४. पोलिस आयुक्त, मुंबई/ठाणे.
२५. महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.
२६. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
२७. व्यवस्थापकीय संचालक, सिडको, मुंबई.
२८. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, मुंबई.
२९. जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे/ठाणे, मुंबई.
३०. सह जिल्हा निंबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी मुंबई शहर/मुंबई उपनगरे/ठाणे.
३१. सह पोलिस आयुक्त वाहतूक, मुंबई/ठाणे.
३२. व्यवस्थापकीय संचालक, मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. मुंबई.
३३. महाव्यवस्थापक, मध्य रेल्वे, मुंबई.
३४. महाव्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, मुंबई.
३५. महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम, (बेस्ट), मुंबई.
३६. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ मुंबई
३७. महाव्यवस्थापक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
३८. महाव्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका परिवहन उपक्रम, ठाणे.
३९. सह सचिव, नगर रचना, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४०. संचालक, नगर रचना, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, पुणे.
४१. उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
४२. कार्यासन अधिकारी (नवि-२१), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४३. निवड नस्ती (नवि-७)

(नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक : एमआरडी-३३१९/प्र.क्र. ०९ /नवि-७, दि. ०६ सप्टेंबर, २०१९ चे सहपत्र)

**परिशिष्ट १**

**मुंबई मेट्रो मार्ग-१० गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) या मेट्रो प्रकल्पाची ठळक वैशिष्टये**

| अ.क्र. | तपशील | |
|---|---|---|
| १. | स्टँन्डर्ड गेज | १४३५ मि.मी. |
| २. | मार्गाची एकूण लांबी | ९.२०९ कि.मी. ( ८.५२९ कि.मी. उन्नत, ०.६८ कि.मी. भुयारी) |
| ३. | एकूण स्थानके | ४ उन्नत |
| ४. | प्रस्तावित कार डेपो | मोघरपाडा |
| ५. | लागणारी जमीन | ८.१३ हेक्टर |
| ६. | प्रकल्प राबविण्याचा कालावधी | २०२२ पर्यंत |
| ७. | जमिनीची किंमत (मूळ) | २१९.४० कोटी |
| ८. | आकस्मित खर्च जमिनीकरीता (३%) | ६.५८ कोटी |
| ९. | राज्यशासनाचा कर (मूळ) | २१२.२४ कोटी |
| १०. | केंद्रशासनाचा कर (मूळ) | २७७.३५ कोटी |
| ११. | प्रकल्पाची मूळ किंमत (जमिन व सर्वकरांसहीत) | ३८२०.९४ कोटी |
| १२. | दरवाढ | ५४७.०५ कोटी |
| १३. | बांधकाम दरम्यानचे व्याज (IDC) | २२ कोटी |
| १४. | प्रकल्प पूर्णत्वाची किंमत | ४४७६ कोटी |
| १५. | वित्तीय अंतर्गत परतावा दर मालमत्ता विकासासह (FIRR) | १०.९१% |
| १६. | आर्थिक परतावा दर (EIRR) (प्रकल्प पूर्णत्वाच्या आधारे) | २२.८६% |
| १७. | प्रवासी क्षमता (८ डब्यांची गाडी) | १. ६ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - १३६८ प्रवासी क्षमता.<br>२. ८ प्रवासी प्रतिवर्ग मीटर प्रमाणे - २३५२ प्रवासी क्षमता. |
| १८. | प्रतिताशी प्रतिदिशा प्रवासी संख्या * (PHPDT) | १. वर्ष २०२१ - ४७,१०२<br>२. वर्ष २०३१ - ४८,१२२ |
| १९. | दैनंदिन प्रवासी संख्या (लक्ष) * | १. वर्ष २०२१-२२ - १४.३२<br>२. वर्ष २०३१-३२ - २१.६२ |

*दैनंदिन प्रवासी संख्या आणि प्रतिताशी प्रति दिशा, प्रवासी संख्या ही संपूर्ण मेट्रो मार्गिका छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली-गायमुख-शिवाजीचौक (मिरा रोड) या संपूर्ण प्रकल्पासाठी अंदाजित करण्यात आली आहे.*

**परिशिष्ट २**

**मुंबई मेट्रो मार्ग-१० गायमुख - शिवाजी चौक (मिरा रोड) या मेट्रो मार्गाच्या प्रकल्पातील आर्थिक सहभागाचा सारांश :**

| अ.क्र. | आर्थिक सहभाग संस्था | रक्कम (रु. कोटीत) | टक्केवारी (%) |
|---|---|---|---|
| १ | मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सहभाग | ३५४.७७ | ७.९३% |
| २ | राज्य शासनाचा सहभाग (एकूण जमिनीची किंमत + राज्य शासनाचा कर + ५०% केंद्र शासनाचा कर) याकरिता राज्यशासनाचे बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य | ७७६.७१ | १७.३५% |
| ३ | केंद्र शासनाचा सहभाग (जमीनीची किंमत, R&R राज्य शासन कर, IDC वगळून) | ५२६.६७ | ११.७७% |
| ४ | बाह्य कर्ज सहाय्य (प्रणाली व आराखडयाचा खर्च) | २८१७.८४ | ६२.९५% |
| | **एकूण** | **४४७६.००** | **१००%** |

*****